As per complaints, the DTH operator "is forcefully offering a bouquet of free-to-air channels with no choice to subscribers and without their consent", the Telecom Regulatory Authority of India (Trai), which is also the broadcast regulator, said in a directive on its website.

"This is in addition to the channels opted by the subscribers and the following message is being displayed: This is a free to air bouquet at no extra charge. If you have selected any pay channel, then this bouquet will not impact your NCF (network capacity fee)," Trai said.

It added that most of the times, the consumers are not able to contact the toll-free number of Dish TV India to express their grievance.

"Now, therefore, the authority, in exercise of its power, directs Dish TV India to resolve the issues...and report compliance within five days from the date of issue of this direction," Trai said in its directive issued on Wednesday.

Trai chairman RS Sharma had earlier this week told *PTI* that the regulator will shortly begin "audit" of subscriber management and other IT systems of errant operators.

Sharma had said consumer choice and consumer interest are "non-negotiable" and "cannot be compromised" and that companies not adhering to rules will have to face the consequences.

Lenders of Ruchi Soya to meet today to consider Patanjali revised offer

LENDERS OF DEBT-RIDDEN Ruchi Soya will meet on Friday to consider the revised bid of Baba Ramdev's Patanjali Ayurved to acquire Madhya Pradesh-based edible oil firm, according to sources. Patanjali had last month increased its bid value by about ₹200 crore to ₹4,350 crore for bankruptcy-bound Ruchi Soya.

Adani Wilmar, which emerged as the highest bidder in August last year after a long drawn battle with Patanjali, had withdrawn from the race citing delay in completion of the insolvency process.

In December 2017, the National Company Law Tribunal (NCLT) had referred Ruchi Soya for insolvency proceedings on the application of creditors Standard Chartered Bank and DBS Bank. Shailendra Ajmera was appointed as resolution professional to manage the affairs of the firm and undertake insolvency process.

According to sources, a meeting of Committee of Creditors is scheduled on Friday to discuss the revised bid of Patanjali.

Ruchi Soya has a total debt of about ₹12,000 crore. The debt-ridden firm has many manufacturing plants and its leading brands include Nutrela, Mahakosh, Sunrich, Ruchi Star and Ruchi Gold.

"We have revised our bid to ₹4,350 crore from earlier offer of ₹4,160 crore. We are ready to bail out Ruchi Soya which has the biggest infrastructure for soyabean. It's a national asset," Patanjali spokesperson SK Tijarawala had said last month. —PTI

श्री स्वामी समर्थ कृपा



स्वप्नातील दृष्टांत

स्वप्नात सांगूनी अशक्य गोष्टी। धनप्राप्ती करविली गरीब कोष्टी।।

मंगळवेढा येथे स्वामी औदुंबराखाली आसनमांडी घालून बसलेले असायचे. मंगळवेढा गावात एक कोष्टी राहत होता. तो स्वामींचा निस्सीम भक्त असून स्वामींच्या दर्शनाला सकाळ-संध्याकाळ येत असे. स्वामींच्या चरणावर मस्तक ठेवून आशिर्वाद मिळाला की आनंदाने तो घरी निघून जायचा. एके दिवशी संध्याकाळी कोष्टी हात जोडून उभा राहिला आणि म्हणाला, स्वामी आज माझे वडील वारीबरोबर पंढरपूरला गेले. मला पांडुरंगाच्या दर्शनाला येण्यासाठी आग्रह करीत होते. त्यांना सांगितले की, स्वामींच्या रुपाने मी रोजच पांडुरंगाचे दर्शन घेतो. तेव्हा स्वामी त्यांच्याकडे पाहून फक्त हसले.

विलास खानोलकर

दोन-चार दिवसांनी आषाढी एकादशीच्या दिवशी पहाटे कोष्ट्याला स्वप्न पडले. स्वप्नात स्वामींनी दर्शन दिले व त्याला जवळ घेतले आणि म्हणाले, माझ्या भक्ता, ह्या क्षणी तुझे वडील पंढरपुरात विठ्ठलाचे दरबारात वैकुंठवासी झाले. ते खूप पुण्यवान म्हणून त्यांना प्रत्यक्ष विठ्ठलासमोर पंढरपुरात मृत्यू आला. कोष्टी आता पोरका झाला होता. तो अतिशय गरीब होता. भिक्षा मागून तो उदरनिर्वाह करू लागला. तो महाराजांचे रोज दर्शन व सेवा करीत असे. महाराजांना त्याची दया येत होती.

एकदा परत त्याच्या स्वप्नात येऊन महाराजांनी सांगितले की, तुझ्या वडिलांनी त्यांचे पश्चात तुझा योगक्षेम नीट चालावा म्हणून तुझ्या घराच्या मागील अंगणात तुळशी वृंदावन आहे, त्या खाली खूप धन पुरून ठेवले आहे, ते तू घे व सुखात आनंदात दिवस काढ. स्वप्न संपले तेव्हा कोष्टी जागा झाला. त्याला क्षणभर स्वप्नाचा अर्थ कळेना. वडील मृत्युमुखी पडल्याचे दुःख तर होते. परंतु वडिलांनी आपणासाठी धन जपून ठेवले आहे हे स्वामींना कसे समजले. तो मागील अंगणात गेला आणि खणून पाहिले तर त्याला तो धनाचा हंडा मिळाला. स्वप्नातील दृष्टांत खरा झाला. त्याच्या आश्चर्याला पारावार राहिला नाही. ते धन घेऊन कोष्टी स्वामींकडे गेला. त्यांना साष्टांग नमस्कार घालून सर्व धन त्यांच्या पायावर ठेवले आणि वर तुळशीचे पान ठेवले. तेव्हा स्वामी मंद हसले आणि म्हणाले, मला काय करायचे हे धन. वडिलांनी तुझ्यासाठी हे ठेवले. तू त्याचा योग्य वापर करून सुखाने रहा. परत स्वामींच्या पायावर त्याने मस्तक ठेवून आनंदाश्रूंनी त्यांच्या चरणावर अभिषेक केला.

संदेश : आनंदी भक्त जाई गात गात ।
स्वामी कृपेने थेट स्वर्गात ।।

(क्रमशः)

लग्नाचे आमिष दाखवून भिवंडीत युवतीवर अत्याचार

वार्ताहर

गर्भपात करून युवतीची फसवणूक

भिवंडी, दि. २५ - शहरातील गैबी नगर, खान कंपाऊंड येथे टेलरिंगचे काम करणाऱ्या २४ वर्षीय युवतीला प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिला लग्नाचे आमिष दाखवून फसवण्याची घटना घडली आहे. आरोपीने या युवतीवर वसई रोडवरील निनाद लॉजवर नेऊन तसेच तिच्या राहत्या घरी वेळोवेळी शारीरिक अत्याचार केल्याने ही तरुणी गरोदर राहिल्याची संतापजनक घटना घडली. याप्रकरणी आरोपी आसिफ खान (२४, रा.भंडारी चौक, दिवांशाह दर्गा) याच्या विरोधात शांतीनगर पोलिस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपीने मोबाईलवरून ओळख झालेल्या व टेलरिंगचे काम करणाऱ्या २४ वर्षीय युवतीशी जून २०१८ पासून प्रेमसंबंध प्रस्थापित केले होते. त्यानंतर तिला लग्नाचे आमिष दाखवून 'मैं तेरे साथ निकाह करुंगा' अशा आणाभाका घेतल्या होत्या.

यादरम्यान त्याने वसई रोडवरील निनाद लॉज व पीडित युवतीच्या घरी जाऊन वेळोवेळी तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले. यादरम्यान युवती तीन महिन्यांची गरोदर राहिल्याने तिने आसिफ याच्याकडे लग्न करण्यासाठी विचारणा केली. मात्र, त्याने लग्नास नकार देऊन तो तिला टाळू लागला व समाजात आपली बदनामी नको यासाठी प्रथम गर्भपात करू व त्यानंतर निकाह करू, असे खोटे सांगून त्याने तिला गर्भपात करण्यासाठी गोळ्या खाण्यास दिल्या.

त्याच्यावर विश्वास ठेवून पीडित युवतीने सदरच्या गोळ्या प्राशन केल्याने तिचा गर्भपात झाला. मात्र तिच्या गर्भपातानंतर त्याने तिला टाळण्यास सुरुवात केली. संपर्क करूनही तो तिला प्रतिसाद देत नव्हता. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे तिच्या लक्षात येताच तिने शांतीनगर पोलीस ठाण्यात जाऊन त्याच्याविरुध्द बलात्काराचा गुन्हा दाखल केला. गुन्हा दाखल झाल्याची कुणकूण आसिफ याला लागताच तो फरार झाला असून त्याचा शोध तपास अधिकारी एपीआय दुर्गेश दुबे करीत आहेत.

मुंबई बॉम्बस्फोटातील आरोपीचा नागपूर कारागृहात मृत्यू

नागपूर, दि. २५ (प्रतिनिधी) - नागपूर मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगत असलेला १९९३ च्या मुंबई बॉम्बस्फोट मालिकेतील एक आरोपी अब्दुल गनी तुर्क (६८) याचा आज दुपारी १२ वाजता मृत्यू झाला.

१९९३ मध्ये मुंबई येथील सेंच्युरी बाजार येथे झालेल्या बॉम्ब स्फोटप्रकरणी अब्दुल गनी तुर्क याला अटक करण्यात आली होती. या खटल्यात तो दोषी सिद्ध झाला होता. त्याला नागपूर मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात आले होते. अब्दुल गनी तुर्क याची आज सकाळी कारागृहात प्रक्रुती बिघडली. यांनतर त्याला लगेच शासकीय वैद्यकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे त्याचा मृत्यू झाला. १९९३ च्या बॉम्बस्फोटातील मुख्य सूत्रधार टायगर मेमन याचा अब्दुल गनी तुर्क सहकारी होता. टायगर मेमन या गुन्ह्यात अद्याप फरार आहे.

मेळघाटातून ब्रॉडगेज रेल्वेमार्ग अशक्य

प्रतिनिधी

नागपूर, दि. २५ - अमरावती जिल्ह्याच्या मेळघाटातील बफर झोनमधून ब्रॉडगेज रेल्वे मार्ग टाकणे अशक्य असल्याचे उत्तर वन विभागाने अखेर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर सादर केले. रेल्वे मार्गाबाबत उत्तर सादर न केल्यास दंडात्मक कारवाईचा इशारा न्यायालयाने दिला होता. त्यानंतर वन विभागाने भूमिका स्पष्ट केली.

मेळघाटातील बफर झोनमधून जाणाऱ्या रेल्वेमार्गाला आव्हान देणारी याचिका प्रमोद शंकरराव जुनघरे यांनी उच्च न्यायालयात दाखल केली आहे. मध्य प्रदेशातील खंडवा ते महाराष्ट्रातील आकोटदरम्यान मीटरगेज रेल्वे मार्ग असून तेथील रेल्वेसेवा १ जानेवारी २०१८ पासून बंद आहे. सदर मार्ग आता ब्रॉडगेजमध्ये विकसित करण्याचा प्रस्ताव आहे. सदर प्रस्तावाला रेल्वे मंत्रालयाने मान्यता दिली. परंतु, त्या मार्गातील ५१ किलोमीटरचा मार्ग मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या बफर झोनमधून जाणार आहे. या मार्गामुळे वाघ व इतर वन्यजीवांना धोका निर्माण होऊ शकतो, असा दावा याचिकेत करण्यात आला.

याशिवाय मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील वन्यजीवांच्या कॉरिडोरलादेखील धक्का बसणार असल्याचा दावा करण्यात आला. त्यामुळे दक्षिण-मध्य रेल्वेने मेळघाट व्याघ्र प्रकल्पामधून रेल्वेमार्ग नेण्याऐवजी पर्यायी मार्ग काढण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने २१ जून २०१८ ला जुन्याच प्रस्तावाला मंजुरी दिली. त्यामुळे हा प्रस्ताव रद्द करावा, अशी याचिकेत विनंती करण्यात आली. त्यावर न्यायालयाने वन विभागाला उत्तर सादर करण्याचा आदेश दिला होता.

सदर प्रकल्पाला भारतीय वन्यजीव संस्था आणि केंद्रीय वन्यजीव मंडळाने विरोध केला आहे. तर आता वन विभागानेदेखील सदर प्रस्ताव अयोग्य असल्याचे मत दिले आहे. केंद्रीय वन्यजीव मंडळाच्या शिफारशीनुसार ब्रॉडगेज रेल्वेमार्गाचा प्रस्ताव अशक्य आहे. त्यामुळे वन्यजीवाला धोका होणार असल्याचे शपथपत्रात नमूद केले आहे. तसेच या ब्रॉडगेज रेल्वेमार्गाचा प्रस्ताव केंद्रीय वन्यजीव मंडळाने राज्य सरकारकडे परत पाठवला असून तो प्रलंबित असल्याचेही शपथपत्रात नमूद केले आहे.

टोरेंट कंपनी ग्राहकांवर अन्याय करीत असेल तर कारवाई करू - मुख्यमंत्री

भिवंडी, दि. २५ (वार्ताहर) - भिवंडीतील टोरेंट कंपनीकडून कोणावरही अन्याय सहन केला जाणार नाही. खासदार कपिल पाटील यांच्या मागणीवरुन टोरेंटबाबत विशेष बैठक बोलावून नागरिकांना दिलासा देऊ, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिले. तर यंत्रमाग व्यावसायिकांच्या समस्या सोडविण्यासाठी सरकार कटिबद्ध असून निवडणुकीनंतर यंत्रमागाच्या वीजपुरवठ्यासाठी २७ एचपीपर्यंत मिळणारे अनुदान ४० एचपीपर्यंत वाढविण्याबाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले.

भिवंडी लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार खासदार कपिल पाटील यांच्या प्रचारासाठी कामतघर येथील स्व. मोतीराम काटेकर क्रीडा संकुलात आयोजित केलेल्या विजय संकल्प सभेत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी भाजपचे कोकण प्रभारी रवींद्र चव्हाण, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख प्रकाश पाटील, आमदार रुपेश म्हात्रे, शांताराम मोरे, नरेंद्र पवार, महेश चौगुले, कुणबी सेनाप्रमुख विश्वनाथ पाटील, उपमहापौर मनोज काटेकर, शहराध्यक्ष सुभाष माने, तालुका प्रमुख विश्वास थळे, श्रमजीवी संघटनेचे प्रदेश सरचिटणीस बाळाराम भोईर आदी उपस्थित होते. या सभेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

भिवंडीतील यंत्रमाग व्यावसायिकांसाठी सरकार संवेदनशील आहे. काही यंत्रमाग व्यावसायिकांनी माझी भेट घेतली. त्यात यंत्रमागावरील वीज अनुदानाची मागणी करण्यात आली. सध्या आचारसंहिता असल्यामुळे मी घोषणा करणार नाही. मात्र, निवडणूक आटोपल्यावर विजेचे अनुदान २७ एचपीवरुन ४० एचपीपर्यंत वाढविण्याबाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. शहरातील नागरिकांना टोरेंटकडून त्रास होत आहे. पण ज्यांनी टोरेंट आणले, तेच आता शिव्या देत आहेत, असा टोला फडणवीस यांनी यावेळी लगावला.

अद्यापही सट्टाबाजारात भाजपच आघाडीवर

प्रतिनिधी

नागपूर, दि. २५ - लोकसभा निवडणुकीचे तीन टप्पे पूर्ण झाले असून पहिल्या टप्प्यापासून आजपर्यंत सट्टा बाजारात भाजपच लोकप्रिय असल्याचे चित्र आहे. तिसऱ्या टप्प्यानंतर या क्षेत्रातील लगवाडी-खायवाडी व्यवहाराचा अंदाज घेतला असता भाजप व काँग्रेस या दोन पक्षांच्याच जागांवर सर्वाधिक उड्या पडत असून त्यात रालोआ आणि संपुआ असा कोणताही भाग नसल्याचे दिसते.

यावर्षी सट्टा बाजारात नागपूर लोकसभेची जागा प्रतिष्ठेचा विषय ठरली असून भाजप-सेना युतीचे उमेदवार केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासाठी लगवाडीचा दर १० पैसे कायम असून याउलट काँग्रेसचे उमेदवार नाना पटोले यांचा दर ५ रुपयांवरून ९ रुपये झाल्याचे दिसते. लोकसभा निवडणुकीत भाजपला स्वबळावर २४१ जागा मिळू शकतात, असा सटोडियांचा अंदाज असून हाच आकडा आधार मानून निरनिराळ्या जागांसाठी भाव देण्यात येत आहे.

सट्टा बाजारातील लगवाडीनुसार भाजपला निवडणुकीत २४१ ते २४४ जागांवर विजय मिळेल व त्यासाठी इतर जागांवर बरोबरीचा भाव देण्यात येत आहे. मतदानाचा पहिला टप्पा संपल्यानंतर व दुसऱ्या टप्प्याच्या प्रारंभी नागपूर व रामटेक या दोन्ही जागांसाठी भाव देण्यात येत होते.

आता मात्र भाजप व काँग्रेसच्या एकूण जागा तसेच नागपूर लोकसभेची जागा अशा दोनच मुद्यांवर व्यवहार सुरू असल्याचे चित्र आहे. सट्टाबाजारातील लगवाडीनुसार भाजप देशातील सर्वात मोठा पक्ष म्हणून या निवडणुकीत स्थान मिळवेल, असा अंदाज आहे. त्यातही २४१ ते २४४ हे आकडे सेट करण्यात आले असून याआधारे ज्यांना लगवाडी करायची आहे आणि खायवाडी घ्यायची आहे,

त्यांच्यासाठी '२४१ लगाओ या २४४ खाओ' असा सांकेतिक संदेश देण्यात आला आहे. सोबतच भाजप २०० जागा मिळवेल या मुद्यावर १५ पैसे लगवाडी आणि १९ पैसे खायवाडी, २२५ जागांसाठी ३५- ४० पैसे, २४१ जागांसाठी ७५- १०० असा दर सुरू आहे.

कुख्यात नक्षलवादी दाम्पत्याचे आत्मसमर्पण

नागपूर, दि. २५ (प्रतिनिधी) - जहाल नक्षलवादी दाम्पत्य दीपक उर्फ मंगलु सुखलु गोगामी आणि मोती उर्फ राधा झुरू मज्जी या दोघांनी नुकतेच गडचिरोलीचे जिल्हा पोलिस अधीक्षक डॉ. शैलेश बलकवडे यांच्यासमोर आत्मसमर्पण केले, अशी माहिती डॉ. शैलेश बलकवडे यांनी पत्रकारांना दिली.

राज्य शासनाने जाहीर केलेली नक्षलवादी आत्मसमर्पण योजना, विविध चकमकींमध्ये नक्षलवाद्यांचा झालेला खात्मा तसेच सततचा हिंसाचार आणि अस्थिर जीवन याला कंटाळून अनेक नक्षलवाद्यांनी पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले आहे. त्यातच या दाम्पत्याचाही समावेश आहे.

दीपक या ३० वर्षीय नक्षलवाद्यावर १७ चकमकी, १२ खून आणि ३ भुसुरुंग स्फोट घडवून आणणे असे गुन्हे दाखल होते. त्याच्यावर राज्य शासनाने ९ लाख २५ हजार रुपयाचे बक्षीसही जाहीर केले होते. तर मोती उर्फ राधा ही २८ वर्षीय नक्षलवादी असून तिच्यावर १५ चकमकी आणि दोन खुनाचे गुन्हे दाखल होते. तिच्यावरही ९ लाख २५ हजाराचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते. दीपक हा २००१ मध्ये जागरगुंडा दलममध्ये दाखल झाला होता, तर २०१२ मध्ये नक्षलवाद्यांची कंपनी क्र.५ मध्ये बीव्हीसी या पदावर कार्यरत होता.

मोती उर्फ राधा ही मार्च २००४ मध्ये भामरागड दलममध्ये सदस्य म्हणून भरती होऊन २०१७ मध्ये उत्तर बस्तर कंपनी क्र.१० मध्ये डीव्हीसी या पदावर नियुक्त झाली होती. यादरम्यानच या दोघांचाही विवाह झाला होता. नक्षलवादी दलममध्ये काम करताना महिलांवर होत असलेले अत्याचार तसेच बळजबरी करून आदिवासी मुलींना नक्षलवादी चळवळीत सामिल करून घेणे, विकासाच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण करणे यामुळे त्रस्त होऊन या दाम्पत्याने पोलिसांसमोर आत्मसमर्पण करीत असल्याचे सांगितले.

विदर्भात आजही पारा चढलेलाच

नागपूर, दि. २५ (प्रतिनिधी) - एप्रिल महिना संपत आला असतानाच विदर्भात पारा दररोज चढत्या भाजणीने वर सरकतो आहे. बुधवारपासून सुरू झालेली उष्णतेची लाट आपला प्रताप सध्या न चुकता दाखवते आहे. नागपूरचे तापमान आज १.८ अंशांनी वाढले असून आज पारा ४४.३ अंश सेल्सिअसवर स्थिरावला आहे. पुढील ४ ते ५ दिवस तापमान असेच चढते राहील, असा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे.

नागपूरसह विदर्भात सर्वत्र पारा वर चढत असून सर्वात जास्त तापमान अकोल्यात ४६.३ इतके नोंदले गेले आहे. त्या खालोखाल ब्रह्मपुरीत ४५.५, वर्धातही ४५.५, तर चंद्रपुरात ४५.४ इतके तापमान आज नोंदले गेले. सर्वात कमी तापमान गोंदिया जिल्ह्यात ३९.८ इतके नोंदले गेले आहे. याचबरोबर अमरावती - ४५, गडचिरोली - ४३, वाशिम -४३.८, यवतमाळ - ४४.५, तर बुलडाणा - ४२.५ इतके तापमान नोंदले गेले आहे. तापमान वाढत असल्यामुळे शहरात सर्वत्र संचारबंदीसदृश वातावरण निर्माण झालेले दिसत आहे. प्रस्तुत प्रतिनिधीने आज दुपारी शहरात फेरफटका मारला असता रस्त्यावर मोजकेच लोक आलेले दिसले. बाकी सर्वांनी कार्यालयात किंवा घरी बसून कुलरची हवा खाणेच पसंत केले.

...तरीही हे गाव मूलभूत सोयीसुविधांपासून वंचित

बी.डी. गायकवाड

स्वातंत्र्यानंतर ७१ वर्षानंतरही या गावाला रस्ता नाही, पटअभावी शाळा बंद, शाळाबाह्य विद्यार्थ्यांची संख्या वाढण्याची भीती, मूलभूत सोयींच्या अभावाने अनेकांचे स्थलांतर

शहापूर, दि. २५ - मुंबईपासून हाकेच्या अंतरावर असलेल्या शहापूर तालुक्यात अनेक गावे मूलभूत सोयीसुविधांपासून वंचित आहेत. त्यातील डोंगरकुशीत वसलेल्या भिवंडी लोकसभा मतदारसंघाअंतर्गत असणाऱ्या शहापूर विधानसभा क्षेत्रात आणि ढाढरे ग्रामपंचायत हद्दीत असणाऱ्या हुंबाचापाडा या गावाची अवस्था भयानक आहे. स्वातंत्र्य मिळून १७ वी लोकसभा निवडणूक आली तरीही या गावात जीवनावश्यक सुविधांअभावी नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत.

शहापूर तालुक्यातील डोंगर भागावर वसलेले जेमतेम १५० लोकवस्तीचे हुंबाचापाडा हे गाव निसर्गाच्या कुशीत वसलेले आहे. मात्र, शासकीय लाल फितीमुळे तेथील लोक शापित जीवन जगत आहेत. गावात मूलभूत सुविधांचा अभाव आहे. पिण्याच्या पाण्यासाठी महिलांना अर्धा किमी पायपीट करावी लागते. अनेकदा तर पाण्यासाठी दगड गोट्यांत आपला जीव धोक्यात घालावा लागतो. पाण्यासाठीची ही ससेहोलपट हुंबाचापाडाच्या नशिबी अनेक वर्षांपासून आहे.

हागणदारी मुक्तीचा बोजवारा

शासन हागणदारी मुक्तीच्या घोषणा करते, पण हुंबाचापाडासारख्या गावात प्यायला पाणी नाही, तिथे शौचालयाची काय बात! त्यामुळे हुंबाचापाडा गाव हे हागणदारीमुक्त म्हणजे बोलाची कढी आणि बोलाचाच भात आहे.

शेती हे एकमेव रोजगाराचे साधन. पण आता शेतीवर गुजराण होत नाही म्हणून अनेकजण मोलमजुरीसाठी अन्यत्र जातात. इथे ये-जा करण्यासाठी रस्ता नसल्याने नागरिकांना आपल्या सामानाची ने-आण स्वतःच करावी लागते. गावात जर कोणी आजारी झाले तर खांद्यावर उचलून ९०० मीटर मुख्य रस्त्यावर आणून इतर वाहनांमधून दवाखाना गाठावा लागतो. रस्त्याअभावी हुंबाचापाडा गावाला या मरणयातना सोसाव्या लागत आहेत. विकासाचा सूर्योदय हुंबाचापाडामध्ये झालाच नाही, अशीच परिस्थिती येथे आहे.

पटाअभावी शाळा बंद

गावात जेमतेम चौथीपर्यंत शाळा, पण पटाअभावी ही शाळा बंद झाली आहे. परंतु आम्हाला ही शाळा पुन्हा चालू करायची असल्याची माहिती उपसरपंच कमल रमेश भोईर यांनी दिली. शिक्षणाचे महत्व समजल्याने गावातील लहान विद्यार्थी ६ किमी पायी प्रवास करून टेंभुर्ली येथे जातात. गुगलच्या नकाशावर जरी या गावचे नाव असले तरी शासनाच्या योजनांमधून मात्र गायब असते. तालुक्यातील रस्त्यांना या गावाला जोडले जावे, गावात पिण्याचे पाणी पोहचावे, शिक्षण आणि आरोग्याची सुविधा निर्माण व्हावी आणि मायबाप सरकारने हे प्रश्न सोडवावेत एवढीच या गावातील नागरिकांची किमान अपेक्षा आहे.

आमचे बऱ्याच वर्षांपासून सुरू असलेले पिण्याच्या पाण्याचे हाल कोणाला समजलेच नाही. पुरूषांच्या मदतीने आम्हाला पाणी भरावे लागते. गढूळ पाणी प्यावे लागते. गावात आरोग्य, शिक्षण, रस्त्याची गैरसोय आहे. शासन, लोकप्रतिनिधी आमच्या समस्या जाणूनच घेत नाहीत. फक्त मतांचे जोगवे मागण्यासाठी येतात. आमचे प्रचंड होल होत आहेत,असे येथील ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

आम्हाला जुनी नळ योजना बेलवली या गावातून होती. यावेळी आम्हाला पाण्याचे दुर्भिक्ष्य नव्हते. २००९ साली आमची वेगळी पाईपलाईन मंजूर झाली होती. त्यावेळी विहीर मंजुरीसाठी प्रयत्नही केले होते. परंतु अधिकाऱ्यांच्या उदासीनतेमुळे नवीन विहीर न बांधता २००० साली झालेल्या नादुरुस्त विहिरीवरूनच पाईपलाईन जोडली गेल्याने पाणी २ वर्षांनंतर येणेच बंद झाले. त्यानंतर २०१४ ला शासन स्तरावरून बेळवली-हुंबाचापाडा ही नळयोजना दुरुस्ती काढली गेली आणि त्याला जोडलेली हुंबाचापाडा ही ९०० मीटरची पाईपलाईन कट करण्यात आल्याने आम्हाला पाणी टंचाई जाणवू लागली आहे, असे ग्रामपंचायत ढाढरेचे उपसरपंच कमल रमेश भोईर यांनी सांगितले.

बेलवली हुंबाचापाडा रस्त्यासंदर्भात वन विभागाची जागा अडथळा असल्याने आम्ही ३/२ चा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. त्याची मंजुरी आली की लागलीच या रस्त्याच्या कामाला लागणार आहोत, असे ढाढरे ग्रामपंचायतीचे सदस्य शरद उमवणे यांनी सांगितले.

जाहीर घोषणा

(आयबीबीआय (लिक्विडेशन प्रोसेस) रेग्युलेशन, २०१६ च्या कलम ३१(२) सहवाचता कलम १२(३) अनुसार)

अकासिया टेलिसर्व्हिसेस प्रा. लि. च्या स्टेकहोल्डर्सच्या माहितीसाठी

आयबीबीआय (लिक्विडेशन प्रोसेस) रेग्युलेशन, २०१६ च्या कलम ३१ अनुसार याद्वारे सूचना देण्यात येते की, अकासिया टेलिसर्व्हिसेस प्रा. लि. (कॉर्पोरेट ऋणको) यांच्या स्टेकहोल्डर्सची सूची मान. एनसीएलटी, मुंबई सह दि. २५ एप्रिल, २०१९ रोजी दाखल झाली.

ज्याअर्थी कॉर्पोरेट ऋणकोंची वेबसाईट कार्यरत नसल्याने स्टेकहोल्डर्सची सूची खालील ईमेल आयडी : casravi.ip@gmail.com यावर ईमेल पाठवून तपासू शकतात.

स्टेकहोल्डर्सनी नोंद घ्यावी की, मान. एनसीएलटी, मुंबई बेंच समक्ष दाखल झालेल्या स्टेकहोल्डर्सच्या सूचीमधील एन्ट्रीमधील बदल मान. एनसीएलटी, मुंबईच्या मंजुरीच्या अधीन राहील.

सही/-
सेथुरथ्नाम रवी
अकासिया टेलिसर्व्हिसेस प्रा. लि. च्या बाबींमधील परिसमापक
आयबीबीआय नोंद क्र. आयबीबीआय/आयपीए-००१/आयपी-पी००३७२/२१७-१८/१०६२९
नोंद. पत्ता : ५०५ ए, रेक्टँगल-१, डिस्ट्रिक्ट सेंटर, साकेत, न्यू दिल्ली-११००१७
ईमेल : casravi.ip@gmail.com

जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, सदनिका नं. २१२, दुसरा मजला, क्षेत्रफल-४४.१४ चौ. मीटर, (बांधिव क्षेत्र), ''चाणक्य नगरी उज्जयनी को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लि.'', भाग प्रमाणपत्र नं. ४६, भाग नं. २२६ ते २३०, स. नं. ४५, हि. नं. ९, गाव मौजे-समेळ, नालासोपारा - (प.), ता. वसई, जि. पालघर, अशी मिळकत श्री. अरूण दत्ताराम मुळीक व श्रीमती आकांक्षा अरूण मुळीक, यांनी श्री. विस्तास्प डी. मास्टर व कुमारी डियाना विस्तास्प मास्टर ह्यांच्याकडून दि. ०९/०४/२०१९ रोजीच्या दस्त क्र. वसई-४-३३९१-२०१९. अन्वये खरेदी केली होती व आहे. ह्या सदनिका संदर्भातील प्रथम खरेदीदार श्रीमती हेतर व्हिस्पी मास्टर हे दि. १७/०८/२०१८ रोजी कोणत्याही मृत्युपत्रा शिवाय मयत झाले. त्यांच्या मृत्युपश्चात १. श्री. व्हिस्पी उर्फ विस्तास्प डी. मास्टर (पती) २. कुमारी डियाना विस्तास्प मास्टर (मुलगी), असे एकूण २ वारस असून अशा या सदनिकेचे आम्ही स्व. हेतर व्हिस्पी मास्टर ह्यांच्या पश्चात त्यांच्या वारसा हक्काच्या दृष्टीकोनातून नामाधिकार तपासत आहोत. तरी सदर मिळकतीबाबत वारसाहक्का संबंधाने कोणाहीकडे हितसंबंधाच्या दृष्टीने वा हस्तांतरणाच्या दृष्टीने विधीग्राह्य ठरेल असा लेखी हरकत घेण्यासारखा पुरावा असेल तर त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत लेखी कायदेशीर पुराव्यासकट आपली हरकत आमचे कार्यालय १२२/११७, सत्यम शिवम शॉपिंग सेंटर, पहिला माळा, नालासोपारा (प.), ता. वसई, जि. पालघर येथे सादर केली पाहिजे, अन्यथा कोणाची काहीच हरकत नाही व हरकत हक्क असल्यास तो सोडून देण्यात आला आहे असे समजून सदर मिळकत अगदी निर्विवाद बोजाविरहित आहे असा दाखला (Clear Title Certificate) देण्यात येईल ही नोंद घ्यावी.

दि. २६/०४/२०१९

आपला,
पेन वकील अँन्ड सन्सकरिता
अॅड. बेन्सन विल्यम पेन

जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, प्लॉट क्र. ७, राम मंदिर जवळ, दत्तपाडा रोड, एचडीएफसी बँक, बोरिवली (पूर्व), मुंबई - ४०००६६ पत्ता असलेली दि. १७/०६/१९८२ रोजीचा नोंदणी क्रमांक बीओएम/एचएसजी/आर/९५६९ धारक महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह सोसायटीज अॅक्ट १९६० अंतर्गत नोंदणीकृत **रामदत्त को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि.** (यापुढे ''सदर मिळकत'') हे खालील लिखित परिशिष्टातील मिळकतीचे मालक त्यासह **''श्री राम कृपा''** नामक इमारत सदर सोसायटीचे सभासद आणि माझे अशिल, सदर सोसायटी दरम्यान विकास करारामधील नोंदवलेल्या अटी आणि शर्तींवर आणि सदर इमारतीच्या डिमॉलिशींग नंतर सदर मिळकतीवर नवीन इमारतीचे बांधकाम आणि सदर इमारतीच्या पुर्नविकासाचे हक्क माझ्या अशिलाच्या नावे सदर सोसायटीने मंजूर केले आहे.

ज्यो कोणत्याही व्यक्तींचे **''श्री राम कृपा''** नामक इमारतीमधील कोणतेही फ्लॅट्स्/दुकाने यामध्ये किंवा त्याच्या कोणत्याही भागावर किंवा सदर मिळकती विरुद्ध किंवा कोणतेही दावे जसे विक्री, अदलाबदल, वारसा, सुविधाधिकार, गहाण, भाडेपट्टा, भेद, ताबा, कुळवहिवाट, जप्ती, न्यायालयीन व्यवहार, प्रोहिबेटरी आदेश, लीसपेनडन्स्, धारणाधिकार, प्रभार, लीव्ह अँड लायसन्स, सामंजस्याचे ज्ञापन, वाटप पत्र किंवा अन्य कोणत्याही मार्गाने सदर मिळकतीमध्ये किंवा त्याच्या कोणत्याही भागावर किंवा सदर इमारतीमधील कोणतेही फ्लॅट्स्/दुकानावर दावे असल्यास त्यांनी निम्नस्वाक्षरीकारांस त्यांचे कार्यालय २०७, लालजी शॉपिंग सेंटर, गणेश बुक स्टोअर्स, एस.व्ही. रोड, बोरिवली (पश्चिम), मुंबई - ४०००९२ येथे सूचना प्रकाशनाच्या १४ दिवसांत कळविणे अन्यथा दावा असल्यास तो त्यागित आणि परित्यागित समजण्यात येईल.

वर उल्लेखित परिशिष्ट :

''श्री राम कृपा'' नामक इमारत आणि त्यावरील उभारीत इमारतीसह मुंबई उपनगराच्या नोंदणीकृत जिल्हा आणि उप-जिल्हा मधील फ्लॅटचे नेट क्षेत्र ४४३ चौ.मी. किंवा त्यासह (आधीचे क्षेत्र वगळता) किंवा तत्सम आणि सी.टी. एस. क्र. २९०/८, गाव कान्हेरी तालुका बोरिवली मोजमापित ४४३.५० चौ.मी. (सेट बॅकद्वारे क्षेत्रासह) धारक प्लॉट क्र. ७, दत्तपाडा रोड, बोरिवली (पूर्व), येथे स्थित तळ किंवा जमिनीच्या प्लॉट चे ते सर्व भाग व विभाग आणि पुढील प्रमाणे सीमाबद्ध :-

उत्तर किंवा त्या दिशेस : मेन दत्तपाडा रोड

दक्षिण किंवा त्या दिशेस : आतील रस्ता आणि सीटीएस क्र. २९०/६ वर उभी राम आशिष इमारत.

पूर्व किंवा त्या दिशेस : सीटीएस क्र. २९१ ए द्वारे भाग आणि सीटीएस क्र. २९०/९ द्वारे भाग.

पश्चिम किंवा त्या दिशेस : सीटीएस क्र. २८९, २८९/१ ते २८९/६ ज्यावरील राम मंदिर आणि त्यावरील उभारीत इमारत.

सदर दिनांक : २३ एप्रिल, २०१९

सही/-
विजय एन. वोरा
(वकील)

जाहीर उद्घोषणा

[रेग्युलेशन ३१(२) सहवाचता इन्सॉल्व्हन्सी अँन्ड बॅकरप्सी (लिक्विडेशन प्रोसेस रेग्युलेशन्स), २०१६ चा रेग्युलेशन १२]

आरटीआयएल लिमिटेडच्या हितसंबंधींचे लक्ष वेधण्याकरिता परिसमापनात

इन्सॉल्व्हन्सी अँन्ड बॅकरप्सी (लिक्विडेशन प्रोसेस रेग्युलेशन्स), २०१६ च्या रेग्युलेशन ३१ नुसार, आरटीआयएल लिमिटेड (परिसमापनात)च्या सर्व हितसंबंधींना याद्वारे जाहीर उद्घोषणा केली आहे की सन्मा. राष्ट्रीय कंपनी विधि न्यायाधिकरण, मुंबई व्यासपीठ यांच्याकडे २२ एप्रिल, २०१९ रोजी हितसंबंधींची सूची दाखल केली आहे.

परिसमापकाद्वारे दाखल केलेल्या रकमेचा संपूर्ण तपशीलासमवेत, वेळोवेळी फेरबदल केलेली रक्कम दर्शविणारी हितसंबंधींची सूची कंपनीच्या वेबसाईटवर पाहता येईल, याला संलग्न लिंक : Http://sknl.co.in/Liquidation%20web-site%20note.html. हितसंबंधींना पुढे कळविण्यांत येते की, सन्मा. एनसीएलटीकडे दाखल केल्याप्रमाणे, हितसंबंधीच्या सूचीमधील नोंदींचा कोणताही फेरबदल केवळ इन्सॉल्व्हन्सी अँन्ड बॅकरप्सी (लिक्विडेशन प्रोसेस रेग्युलेशन्स), २०१६च्या रेग्युलेशन ३१(३) आणि ३१ (४) च्या अनुसार करता येईल.

तारीख आणि ठिकाण : २६ एप्रिल, २०१९, म्हैसूर

सही/-
रवि शंकर देवरकोंडा
आरटीआयएल लिमिटेड करिता परिसमापक

30 YEARS MOTILAL OSWAL

मोतीलाल ओस्वाल फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड

सीआयएनः एल६७१९०एमएच२००५पीएलसी१५३३९७
नोंद. कार्यालयः मोतीलाल ओस्वाल टॉवर, रहिमतुल्ला सयानी रोड, परेल एस. टी. डेपोसमोर, प्रभादेवी, मुंबई-४०० ०२५.
दूरध्वनी क्र.: +९१ २२ ७१९३ ४२००; फॅक्स क्र.: +९१ २२ ५०३६ २३६५;
वेबसाईटः www.motilaloswalgroup.com ई-मेलः shareholders@motilaloswal.com

सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनी अधिनियम, २०१३ (''अॅक्ट'') चे कलम १२४(६) च्या तरतुदी सहवाचता इन्व्हेस्टर एज्युकेशन अँन्ड प्रोटेक्शन फंड अॅथॉरिटी (अकाऊंटिंग, ऑडीट, ट्रान्सफर अँन्ड रिफंड) रुल्स २०१६ (रुल्स) (वेळोवेळी सुधारणा केल्याप्रमाणे) नुसार कंपनीला क्रमवार सात वर्षे वा अधिक करिता भागधारकांद्वारे दावा न केलेल्या वा प्रदान न केलेल्या लाभांशासंबंधीचे सर्व शेअर्स इन्व्हेस्टर एज्युकेशन अँन्ड प्रोटेक्शन फंड (''आयईपीएफ'') च्या नावे हस्तांतरित करणे आवश्यक आहे.

कंपनीने वित्तिय वर्ष २०११-१२ पासून सुरु झालेल्या क्रमवार गेली सात वर्षे वा अधिक करिता त्यांनी लाभांश दावा/रोख केलेला नाही त्या संबंधित भागधारकांच्या नोंदणीकृत पत्त्यावर वैयक्तिक पत्रव्यवहार पाठविला आहे. कंपनीने, ज्यांचा लाभांश क्रमवार सात वर्षाकरिता दावा न करता राहिलेला आहे आणि ज्यांचे शेअर्स आयईपीएफकडे हस्तांतर करण्याकरिता देय आहेत अशा संबंधित भागधारकांचा संपूर्ण तपशील (म्हणजे नाव, फोलिओ क्र./डीपी आयडी-क्लायंट आयडी इ.) सुध्दा तिची वेबसाईट www.motilaloswalgroup.com वर अपलोड केला आहे.

जर कंपनी/कंपनीचे रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट (''आरटीए'') कडे **सोमवार, १ जुलै, २०१९** रोजी वा त्यापूर्वी दावा न केलेल्या लाभांशाचा दावा करण्याकरिता संबंधित भागधारकांद्वारे कोणताही पत्रव्यवहार प्राप्त न झाल्यास पुढील कोणत्याही सूचनेशिवाय रुल्सच्या तरतुदींनुसार आयईपीएफ सस्पेन्स खात्याकडे असे शेअर्स हस्तांतरित करण्यासाठी कंपनीद्वारे आवश्यक कृती सुरु करण्यात येईल.

जर संबंधित भागधारक आयईपीएफ सस्पेन्स खात्याकडे हस्तांतरित झाल्यानंतर शेअर्सचा दावा करण्यासाठी इच्छुक असल्यास रुल्स अन्वये विहित केल्याप्रमाणे आणि आयईपीएफची वेबसाईट www.iepf.gov.in वर उपलब्ध असलेल्या प्रपत्र आयईपीएफ-५ मध्ये, आयईपीएफ अॅथॉरिटीकडे वेगळा अर्ज करता येईल.

पुढील माहिती/प्रदान न केलेल्या/दावा न केलेल्या लाभांशासाठी दावा करण्याकरिता विनंती करिता, संबंधित भागधारकांना आरटीए म्हणजे लिंक इनटाईम इंडिया लिमिटेड यांना सी-१०१, २४७ पार्क, एलबीएस मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई-४०० ०८३, दूर. क्र.: ०२२ ४९१८६०००, फॅक्स क्र.: ०२२-४९१८६०६०, ईमेल आयडीः iepf.shares@linkintime.co.in येथे संपर्क साधता येईल.

मोतीलाल ओस्वाल फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड करिता

सही/-
कैलाश पुरोहित
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी

ठिकाणः मुंबई
तारीखः २५ एप्रिल, २०१९

टीपः

मोतीलाल ओस्वाल सिक्युरिटीज लिमिटेड (''एमओएसएल'') चे सन्मा. राष्ट्रीय कंपनी विधि न्यायाधिकरण, मुंबई न्यायपीठ द्वारा जारी केलेल्या ३० जुलै, २०१८ रोजीच्या आदेशानुसार २१ ऑगस्ट, २०१८ पासून मोतीलाल ओस्वाल फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड (''एमओएफएसएल'') सह एकत्रिकरण झाले आहे. एमओएफएसएल नोंदणीकरण क्र.: आयएनझेड०००१५८८३६ (बीएसई/एनएसई/एमसीएक्स/एनसीडीईएक्स); सीडीएसएल आणि एनएसडीएलः आयएन-डीपी-१६-२०१५; रिसर्च अॅनालिस्टः आयएनएच०००००४१२. एएमएफआयः एआरएन-१४६८२२, गुंतवणूक सल्लागारः आयएनए०००००७१००; इन्शुरन्स कॉर्पोरेट एजंटः सीए०५७९.